नि. फौ. खटला क्र.२६७/२०२२ निशाणी क्रमांक १०

**उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. धीरज लामसंगे यांच्यामार्फत**

५] माझ्या घरापासून डीजे वाजत असलेला कार्यक्रम एक गल्लीच्या अंतरावर होता. हे म्हणणे खरे आहे की आमच्या वस्तीतील रस्ता कच्चा आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी माझे पती दारू पिऊन नाचत होते. हे म्हणणे खरे नाही की माझे पती सदर कार्यक्रमात धूमधाम करत होते व आजूबाजूच्या लोकांना धक्के मारत होते. हे म्हणणे खरे नाही की माझे पती हे लोकांना धक्काबुक्की करत होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने कधीही माझा कधी हात पकडला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला सांगितले की "तेरी हिंमत कैसे हुई हात पकडनेकी" हे मी खोटे सांगत आहे.

६] हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्या गालावर थापड मारली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे पती धूमधाम करत होते व कोणाचे ऐकत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की लोक माझ्या पतीला समजावून सांगत होते की तुम्ही दारू पिऊन आहात त्यामुळे घरी निघून जा धूमधाम करू नका. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी व माझ्या घरच्या लोकांनी माझ्या पतीला फरफटत घरी घेऊन गेले त्यामुळे त्याला जखमा झाल्या होत्या.

७] हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीने दारू पिऊन मला मारहाण केली त्यामुळे मला जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीला कोणीही घटनेच्या दिवशी मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या डाव्या हाताला मार लागला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मला कोणी मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी हेतू पुरस्कर माझ्या पतीसोबत संगणमत करून आरोपी विरुद्ध दुसऱ्या दिवशी खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

८] हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीला आरोपींनी मारहान केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की गुन्ह्यातील जप्त कुर्ती मी आज रोजी पहिल्यांदा बघत आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की आरोपी नरेश बावने याने माझी कुर्ती समोरून फाडली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी कोर्टात खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-

**( व्ही. आय. शेख )**

दिनांक : १०/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, हिंगणा